04 FEB 2025 सकाळ जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हाप

# अहिल्यादेवी होळकर सत्त्वशील राजकारणी

## विनया खडपेकर : विद्यापीठात चर्चासत्र

**कोल्हापूर, ता. ३ : 'अहिल्यादेवी होळकर यांनी सत्त्वशील राजकारणी म्हणून होळकरशाहीचे नाव उंचावले. त्यांचा कालखंड हा होळकरशाहीचा लौकिक वृद्धिंगत करणारा ठरला', असे गौरवोद्गार ज्येष्ठ लेखिका विनया खडपेकर यांनी आज काढले.**



कोल्हापूर : 'शोध होळकरशाहीचा' या कार्यशाळेत बीजभाषण करताना ज्येष्ठ लेखिका विनया खडपेकर. यावेळी उपस्थित कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, देविदास पोटे, आदी.

शिवाजी विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासनातर्फे त्यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सव वर्षानिमित्त 'शोध होळकरशाहीचा' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात त्यांचे बीजभाषण झाले. इतिहास अधिविभाग सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

खडपेकर म्हणाल्या, 'आर्थिक व्यवहारांच्या बाबतीतही अहिल्यादेवी या अत्यंत काटेकोर आणि चोख होत्या. त्या काळी पतीमाघारी वारसा अभावी राजकारभार चालविण्यासाठी दत्तकविधान करून त्याच्या नावे कारभार चालविण्याची प्रथा होती. तथापि, मुलाच्या मृत्यूनंतर अहिल्यादेवींनी माधवराव पेशव्यांकडे थेट कारभाराच्या अधिकाराची मागणी केली. त्यामुळे माधवरावांनी अहिल्यादेवींकडे मुलकी तर तुकोजी होळकरांकडे फौजी अधिकार सुपुर्द केले. हे अहिल्यादेवींच्या राजकारणाचे फलित होते.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'नेतृत्व विकास गुण आणि त्यांच्या जीवनकार्यातील विविध पैलू यांच्या अनुषंगाने अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्राचा संशोधकांनी अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.'

यावेळी डॉ. विनिता तेलंग, देविदास पोटे, अवनीश पाटील, गोविंद कोळेकर, नीलांबरी जगताप, दत्तात्रय मचाले उपस्थित होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. मच्छिंद्र गोफणे यांनी प्रास्ताविक केले. दत्तात्रय घोटुगडे यांनी आभार मानले.

### प्रदर्शनातून जीवनकार्यावर प्रकाश

**या कार्यशाळेच्या निमित्ताने अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारे विशेष प्रदर्शन भरविले आहे. त्यात अहिल्यादेवींच्या जीवनकार्याविषयीची चित्रे, माहिती फलक, नाणी, शस्त्रे, वस्तू, दुर्मीळ पुस्तके, स्मरणिका, आदींचा समावेश आहे.**

04 FEB 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अहिल्यादेवी होळकर सत्वशील राजकारणी

## ज्येष्ठ लेखिका विनया खडपेकर | शिवाजी विद्यापीठात 'शोध होळकरशाहीचा' चर्चासत्र



### विशेष प्रदर्शनाचे आयोजन

या कार्यशाळेच्या निमित्ताने अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणाऱ्या विशेष प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अहिल्यादेवींच्या जीवनकार्याविषयीची चित्रे, माहितीफलक, नाणी, शस्त्रे, वस्तू, दुर्मिळ पुस्तके, स्मरणिका आदींचा समावेश होता. या प्रदर्शनाची कुलगुरु डॉ. शिर्के यांनी पाहणी केली आणि आयोजकांकडून

। कोल्हापूर : प्रतिनिधी

अहिल्यादेवी होळकर यांनी सत्त्वशील राजकारणी म्हणून होळकरशाहीचे नाव उंचावले, असे गौरवोद्गार ज्येष्ठ लेखिका विनया खडपेकर यांनी काढले. शिवाजी विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासनातर्फे त्यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सव वर्षानिमित्त 'शोध होळकरशाहीचा' या विषयावर सोमवारी एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले. त्यावेळी बीजभाषक म्हणून त्या बोलत होत्या. इतिहास अधिविभाग सभागृहात झालेल्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

विनया खडपेकर पुढे म्हणाल्या, अहिल्यादेवी यांनी होळकरशाहीचा कारभार राणी म्हणून नव्हे, तर विश्वस्त म्हणून सांभाळला. धार्मिक आणि सत्त्वशील राजकारणी म्हणून त्यांनी सर्वदूर लौकिक प्राप्त केला. त्याचप्रमाणे आर्थिक व्यवहारांच्या बाबतीतही त्या अत्यंत काटेकोर आणि चोख होत्या. त्या काळी पतीमाघारी वारसाअभावी राजकारभार चालविण्यासाठी दत्तकविधान करून त्याच्या नावे कारभार चालविण्याची प्रथा होती. तथापि, मुलाच्या मृत्यूनंतर अहिल्यादेवींनी माधवराव पेशव्यांकडे थेट कारभाराच्या अधिकाराची मागणी केली. त्यामुळे माधवरावांनी अहिल्यादेवींकडे मुलकी तर तुकोजी होळकरांकडे फौजी अधिकार सुपूर्द केले. हे अहिल्यादेवींच्या राजकारणाचे फलित होते.

त्याचप्रमाणे युद्धासाठी नाना फडणवीस आणि महादजी शिंदे यांनी पैशांची मागणी केली असता ती स्पष्टपणे नाकारून युद्धासाठीचा पैसा हा तुमचा तुम्हीच मिळवावा, असे बाणेदारपणे सांगण्यातून आर्थिक व्यवहार सजगता दिसून येते. अहिल्यादेवींचा कालखंड हा होळकरशाहीचा लौकिक वृद्धिंगत करणारा ठरला, असेही त्या म्हणाल्या. पूर्वी इतिहासलेखन हे केवळ युद्धांविषयीचेच होते आणि अहिल्यादेवी या युद्धात नव्हत्या. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या कर्तृत्वाबद्दलही लिहिण्याचा इतिहास नव्हता. त्यामुळे अहिल्यादेवींविषयी इतिहासात खूपच त्रोटक माहिती उपलब्ध आहे. त्यांच्याविषयी माहिती गोळा करण्यासाठी अस्सल साधनांचा खूप शोध घ्यावा लागल्याचेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, नेतृत्वविकास गुण आणि त्यांच्या जीवनकार्यातील विविध अलक्षित पैलू यांच्या अनुषंगाने अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्राचा संशोधकांनी अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. अहिल्यादेवी यांच्याविषयी जर काही संदर्भसाहित्य स्वामित्वहक्काबाहेर असतील, तर असे साहित्य संशोधकांच्या व्यापक उपयोगासाठी अध्यासनाने या त्रिशताब्दी जयंती वर्षात हाती घ्यावा. विनया खडपेकर यांच्या भाषणाची पुस्तिका तयार करावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

यावेळी डॉ. विनिता तेलंग, डॉ. देवीदास पोटे उपस्थित होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. मच्छिंद्र गोफणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. दत्तात्रय घोटुगडे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अवनीश पाटील, डॉ. गोविंद कोळेकर, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. दत्तात्रय मचाले यांच्यासह मराठी, हिंदी, इतिहास, अर्थशास्त्र इत्यादी विषयांचे शिक्षक, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

04 FEB 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# अहिल्यादेवी होळकर सत्त्वशील राजकारणी: विनया खडपेकर

**कोल्हापूर, (महा न्यूज अॅण्ड व्ह्यूज) :** अहिल्यादेवी होळकर यांनी सत्त्वशील राजकारणी म्हणून होळकरशाहीचे नाव उंचावले, असे गौरवोद्गार ज्येष्ठ लेखिका विनया खडपेकर यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासनातर्फे त्यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सव वर्षानिमित्त 'शोध होळकरशाहीचा' या विषयावर आज एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले. त्यावेळी बीजभाषक म्हणून त्या बोलत होत्या. इतिहास अधिविभाग सभागृहात झालेल्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.



विनया खडपेकर म्हणाल्या, अहिल्यादेवी यांनी होळकरशाहीचा कारभार राणी म्हणून नव्हे, तर विश्वस्त म्हणून सांभाळला. धार्मिक आणि सत्त्वशील राजकारणी म्हणून त्यांनी सर्वदूर लौकिक प्राप्त केला. त्याचप्रमाणे आर्थिक व्यवहारांच्या बाबतीतही त्या अत्यंत काटेकोर आणि चोख होत्या. त्या काळी पतीमाघारी वारसाअभावी राजकारभार चालविण्यासाठी दत्तकविधान करून त्याच्या नावे कारभार चालविण्याची प्रथा होती. तथापि, मुलाच्या मृत्यूनंतर अहिल्यादेवींनी माधवराव पेशव्यांकडे थेट कारभाराच्या अधिकाराची मागणी केली. त्यामुळे माधवरावांनी अहिल्यादेवींकडे मुलकी तर तुकोजी होळकरांकडे फौजी अधिकार सुपूर्द केले. हे अहिल्यादेवींच्या राजकारणाचे फलित होते. त्याचप्रमाणे युद्धासाठी नाना फडणवीस आणि म हादजी शिंदे यांनी पैशांची मागणी केली असता ती स्पष्टपणे नाकारून युद्धासाठीचा पैसा हा तुमचा तुम्हीच मिळवावा, असे बाणेदारपणे सांगण्यातून आर्थिक व्यवहार सजगता दिसून येते. अहिल्यादेवींचा कालखंड हा होळकरशाहीचा लौकिक वृद्धिंगत करणारा ठरला, असेही त्या म्हणाल्या.

पूर्वी इतिहासलेखन हे केवळ युद्धांविषयीचेच होते आणि अहिल्यादेवी या युद्धात नव्हत्या. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या कर्तृत्वाबद्दलही लिहिण्याचा इतिहास नव्हता. त्यामुळे अहिल्यादेवींविषयी इतिहासात खूपच त्रोटक माहिती उपलब्ध आहे. त्यांच्याविषयी माहिती गोळा करण्यासाठी अस्सल साधनांचा खूप शोध घ्यावा लागल्याचेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, नेतृत्वविकास गुण आणि त्यांच्या जीवनकार्यातील विविध अलक्षित पैलू यांच्या अनुषंगाने अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्राचा संशोधकांनी अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. अहिल्यादेवी यांच्याविषयी जर काही संदर्भसाहित्य स्वामित्वहक्काबाहेर असतील, तर असे साहित्य संशोधकांच्या व्यापक उपयोगासाठी अध्यासनाने या त्रिशताब्दी जयंती वर्षात हाती घ्यावा. विनया खडपेकर यांच्या भाषणाची पुस्तिका तयार करावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

कार्यक्रमात मंचावर डॉ. विनिता तेलंग, डॉ. देवीदास पोटे होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. मच्छिंद्र गोफणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. दत्तात्रय घोटुगडे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अवनीश पाटील, डॉ. गोविंद कोळेकर, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. दत्तात्रय मचाले यांच्यासह मराठी, हिंदी, इतिहास, अर्थशास्त्र इत्यादी विषयांचे शिक्षक, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

**विशेष प्रदर्शनाचे आयोजन**

या कार्यशाळेच्या निमित्ताने अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणाऱ्या विशेष प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अहिल्यादेवींच्या जीवनकार्याविषयीची चित्रे, माहितीफलक, नाणी, शस्त्रे, वस्तू, दुर्मिळ पुस्तके, स्मरणिका आदींचा समावेश होता. या प्रदर्शनाची कुलगुरू डॉ. शिर्के यांनी पाहणी केली आणि आयोजकांकडून त्याविषयी माहिती घेतली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 FEB 2025

दै. रणझुंजार

# अहिल्यादेवी होळकर सत्त्वशील राजकारणी: विनया खडपेकर

कोल्हापूर : अहिल्यादेवी होळकर यांनी सत्त्वशील राजकारणी म्हणून होळकरशाहीचे नाव उंचावले, असे गौरवोद्गार ज्येष्ठ लेखिका विनया खडपेकर यांनी काढले. शिवाजी विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासनातर्फे त्यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सव वर्षानिमित्त 'शोध होळकरशाहीचा' या विषयावर आज एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले. त्यावेळी बीजभाषक म्हणून त्या बोलत होत्या. इतिहास अधिविभाग सभागृहात झालेल्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.



विनया खडपेकर म्हणाल्या, अहिल्यादेवी यांनी होळकरशाहीचा कारभार राणी म्हणून नव्हे, तर विश्वस्त म्हणून सांभाळला. धार्मिक आणि सत्त्वशील राजकारणी म्हणून त्यांनी सर्वदूर लौकिक प्राप्त केला. त्याचप्रमाणे आर्थिक व्यवहारांच्या बाबतीतही त्या अत्यंत काटेकोर आणि चोख होत्या. त्या काळी पतीमाघारी वारसाअभावी राजकारभार चालविण्यासाठी दत्तकविधान करून त्याच्या नावे कारभार चालविण्याची प्रथा होती. तथापि, मुलाच्या मृत्यूनंतर अहिल्यादेवींनी माधवराव पेशव्यांकडे थेट कारभाराच्या अधिकाराची मागणी केली. त्यामुळे माधवरावांनी अहिल्यादेवींकडे मुलकी तर तुकोजी होळकरांकडे फौजी अधिकार सुपूर्द केले. हे अहिल्यादेवींच्या राजकारणाचे फलित होते.

त्याचप्रमाणे युद्धासाठी नाना फडणवीस आणि महादजी शिंदे यांनी पैशांची मागणी केली असता ती स्पष्टपणे नाकारून युद्धासाठीचा पैसा हा तुमचा तुम्हीच मिळवावा, असे बाणेदारपणे सांगण्यातून आर्थिक व्यवहार सजगता दिसून येते. अहिल्यादेवींचा कालखंड हा होळकरशाहीचा लौकिक वृद्धिंगत करणारा ठरला, असेही त्या म्हणाल्या.

पूर्वी इतिहासलेखन हे केवळ युद्धांविषयीचेच होते आणि अहिल्यादेवी या युद्धात नव्हत्या. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या कर्तृत्वाबद्दलही लिहिण्याचा इतिहास नव्हता. त्यामुळे अहिल्यादेवींविषयी इतिहासात खूपच त्रोटक माहिती उपलब्ध आहे. त्यांच्याविषयी माहिती गोळा करण्यासाठी अस्सल साधनांचा खूप शोध घ्यावा लागल्याचेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, नेतृत्वविकास गुण आणि त्यांच्या जीवनकार्यातील विविध अलक्षित पैलू यांच्या अनुषंगाने अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्राचा संशोधकांनी अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. अहिल्यादेवी यांच्याविषयी जर काही संदर्भसाहित्य स्वामित्वहक्काबाहेर असतील, तर असे साहित्य संशोधकांच्या व्यापक उपयोगासाठी अध्यासनाने या त्रिशताब्दी जयंती वर्षात हाती घ्यावा. विनया खडपेकर यांच्या भाषणाची पुस्तिका तयार करावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

कार्यक्रमात मंचावर डॉ. विनिता तेलंग, डॉ. देवीदास पोटे होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. मच्छिंद्र गोफणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. दत्तात्रय घोटुगडे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अवनीश पाटील, डॉ. गोविंद कोळेकर, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. दत्तात्रय मचाले यांच्यासह मराठी, हिंदी, इतिहास, अर्थशास्त्र इत्यादी विषयांचे शिक्षक, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

**विशेष प्रदर्शनाचे आयोजन**

या कार्यशाळेच्या निमित्ताने अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणाऱ्या विशेष प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अहिल्यादेवींच्या जीवनकार्याविषयीची चित्रे, माहितीफलक, नाणी, शस्त्रे, वस्तू, दुर्मिळ पुस्तके, स्मरणिका आदींचा समावेश होता. या प्रदर्शनाची कुलगुरू डॉ. शिर्के यांनी पाहणी केली आणि आयोजकांकडून त्याविषयी माहिती घेतली.

04 FEB 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आबालवृद्ध कलाकारांनी साकारल्या शिल्पाकृती

## यश कुंभार प्रथम : शिल्पमहर्षी खेडकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ३ : शिल्पमहर्षी शिल्पकार बी. आर. खेडकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुणे येथील शिल्पसम्राट कला स्टुडिओ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे आज आयोजित शिल्पकला कार्यशाळेला आबालवृद्ध कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. त्यात ४८ शिल्पकारांनी त्यांच्या शिल्पाकृती साकारल्या. त्यातील यश कुंभार याच्या शिल्पाकृतीने प्रथम क्रमांक पटकविला.

या कार्यशाळेमध्ये कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, सातारा, कणकवली, छत्रपती संभाजीनगर, निपाणी येथील काही हौशी, काही शिकाऊ आणि काही तयार शिल्पकारांनी सहभाग घेतला. सहावीच्या विद्यार्थ्यांपासून ते ७० वर्षांच्या ज्येष्ठांपर्यंत व्यक्तींचा सहभाग हे कार्यशाळेचे वैशिष्ट्य ठरले. खेडकर यांच्या कन्या शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के आणि शिल्पकार संजीव संकपाळ यांनी सुरुवातीला सहभागींना शिल्प कसे तयार करावयाचे, याची प्रात्यक्षिके दाखविली. त्यानंतर सहभागींनी त्यांच्या त्यांच्या कल्पनेनुसार विविध शिल्पे साकारली. त्यामध्ये बी. आर. खेडकर यांना आदरांजलीपर अशीही काही शिल्पे तयार करण्यात आली. भित्तीशिल्पे, मूर्ती, लाईव्ह मूर्ती, संकल्पशिल्पे अशा अनेक प्रकारच्या शिल्पाकृती कलाकारांनी तयार केल्या.





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित शिल्पकला कार्यशाळेत सहभागी कलाकार आपल्या शिल्पाकृती घडविताना. दुसऱ्या छायाचित्रात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के, संजीव संकपाळ, डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांच्यासमवेत शिल्पकला कार्यशाळेतील पारितोषिक विजेते.

या कार्यशाळेत दर्शन मिस्त्री याने द्वितीय, रोहन कुंभार याने तृतीय क्रमांक, तर रोहित बावडेकर, अभिनंदन कुंभार, मन्वित कांबळे यांनी उत्तेजनार्थ क्रमांक मिळविला. त्यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. संजीव संकपाळ, बबन माने, सीमा खेडकर-शिर्के यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. तृप्ती पुरेकर यांनी सूत्रसंचालन केले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी आभार मानले. दीपक बीडकर आणि सहकाऱ्यांनी कार्यशाळेचे संयोजन केले.

04 FEB 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिल्पकारांनी साकारले व्यक्तीशिल्प

- प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन



कोल्हापूर : व्यक्ती शिल्प साकारताना स्वर्गीय शिल्पकार बी. आर. खेडकर यांची कन्या शिल्पकार सिमा खेडकर-शिर्के.



शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यशाळेत व्यक्तीशिल्प साकारताना शिल्पकार संजीव संकपाळ.



स्वर्गीय शिल्पकार बी. आर. खेडकर यांची यशोगाथा युवराज कुंभार यांनी साकारला.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिल्पकार संजीव संकपाळ आणि सिमा खेडकर यांनी हुबेहब व्यक्ती शिल्प साकारून सर्वांची मने जिंकली. तर अनेक शिल्पकारांनी शिल्पकार बी. आर. खेडकर यांचे शिल्प साकारून विद्यापीठ परिसराचे लक्ष वेधून घेतले. विद्यापीठाच्या बॅ. ाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रासमोरील उद्यानात शिल्पकार शिल्प साकारण्यात व्यस्त होते. त्यांनी शिल्पकारांनी साकारलेल्या शिल्पातून त्यांच्यातील कौशल्य अनुभवले. ही शिल्पे पाहण्यासाठी विद्यार्थी, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी गर्दी केली होती. विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक देवून गौरवण्यात आले.

शिल्पमहर्षी शिल्पकार बी.आर. खेडकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवाजी विद्यापीठात शिल्पकला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

शिल्पकार बी. आर. खेडकर यांची कन्या शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के आणि शिल्पकार संजीव संकपाळ यांनी प्रात्यक्षिकांसह उपस्थितांना मार्गदर्शन केले. युवराज कुंभार यांनी बी. आर. खेडकर यांची यशोगाथा साकारून सर्वांचे लक्ष वेधले. अमृत अब्दागिरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे पोर्ट्रेट साकारले. रोहन कुंभार व शितल पाटील यांनी क्रियेटीव्ह शिल्प साकारले. आकाश कुंभार यांनी दिवंगत शिल्पकार बी. आर. खेडकर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे निरीक्षण करतानाचे पोर्ट्रेट साकारले.

विराज कुंभार,कुणाल कुंभार, अभिनंदन कुंभार यांनी कंपोझिशन प्रकारातील शिल्प, प्रिती पुरोहित यांनी मोराचे तर श्रीकांत कुणाळकर यांनी रिलीफ शिल्प साकारले. प्रज्वल कुंभार यांनी लेडी फिगर साकारली. मन्वीत कांबळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज व प्रथमेश सिध्दार्थ यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज, सुरज पुरेकर यांनी पक्षी तर प्राजक्ता बनसोडे व करण कुंभार,शुभम कुंभार, वरद कुंभार यांनी उठीव शिल्प साकारले.दिनकर कुंभार यांनी गणपतीची आकर्षक मुर्ती साकारली होती.सतीश वडणगेकर यांनी जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिल्प साकारले.

## या कलाकारांचा पारितोषिक देवून गौरव

कार्यशाळेतील यश कुंभार यांच्या शिल्पाला प्रथम क्रमांकाला २०००, दर्शन मिस्त्री यांच्या शिल्पाला द्वितीय क्रमांकाला १००० आणि रोहन कुंभार यांच्या शिल्पाला तृतीय क्रमांकाला ५०० रोख पारितोषिके व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पारितोष्कि वितरण समारंभ पार पडला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 FEB 2025
लोकमत

# शिल्पकार... मातीला आकार..!



शिल्पमहर्षी स्व. बी. आर. खेडकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुणे येथील शिल्पसम्राट कला स्टुडिओ व शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांच्या वतीने आयोजित शिल्पकला कार्यशाळेला आबालवृद्ध कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिल्पकला कार्यशाळेत कलाकार शिल्पाकृती घडविताना असे मग्न झाले होते.

04 FEB 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात ४८ शिल्पकारांकडून मातीला आकार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिल्पमहर्षी शिल्पकार बी. आर. खेडकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुणे येथील शिल्पसम्राट कला स्टुडिओ आणि शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिल्पकला कार्यशाळेला आबालवृद्ध कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ४८ शिल्पकारांनी कार्यशाळेत आपल्या शिल्पाकृती तयार करून सादर केल्या. यामध्ये यश कुंभार याच्या शिल्पाकृतीस प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले.



कार्यशाळेमध्ये काही हौशी, काही शिकाऊ आणि काही तयार अशा ४८ शिल्पकारांनी सहभाग घेतला. सहावीच्या विद्यार्थ्यांपासून ते ७० वर्षांच्या ज्येष्ठांपर्यंत व्यक्तींचा सहभाग हे कार्यशाळेचे वैशिष्ट्य ठरले. काहींनी तर प्रथमच हातात माती घेऊन तिला आकार देण्याचा

## यश कुंभार प्रथम

**शिल्पमहर्षी बी. आर. खेडकर शिल्पकला कार्यशाळेत यश कुंभार याला प्रथम पारितोषिक.**

**कार्यशाळेमध्ये सहभाग घेतलेल्या ४८ शिल्पकारांनी आपल्या शिल्पाकृती तयार करून सादर केल्या.**

यशस्वी प्रयत्न केला. बी. आर. खेडकर यांच्या कन्या शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के आणि शिल्पकार संजीव संकपाळ यांनी सुरुवातीला सहभागींना शिल्प कसे तयार करावयाचे याची प्रात्यक्षिके दाखविली.

त्यानंतर सहभागींनी त्यांच्या त्यांच्या कल्पनेनुसार विविध शिल्पे साकारली. त्यामध्ये बी. आर. खेडकर यांना आदरांजलीपर अशीही काही शिल्पे तयार करण्यात आली. भित्तीशिल्पे, मूर्ती, लाइव्ह मूर्ती, संकल्पशिल्पे अशा अनेक प्रकारच्या शिल्पाकृती कलाकारांनी तयार केल्या.

सायंकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यामध्ये यश कुंभार याने प्रथम, दर्शन मिस्त्री याने द्वितीय आणि रोहन कुंभार याने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

तृप्ती पुरेकर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी आभार मानले.

04 FEB 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# बी.आर. खेडकर शिल्पकला कार्यशाळेला शिवाजी विद्यापीठात उत्स्फूर्त प्रतिसाद

## आबालवृद्धांकडून ४८ शिल्पाकृतींची निर्मिती ; यश कुंभार याला प्रथम पारितोषिक

**कोल्हापूर, (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज) :**

शिल्पमहर्षी शिल्पकार स्व. बी.आर. खेडकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुणे येथील शिल्पसम्राट कला स्टुडिओ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या शिल्पकला कार्यशाळेला आबालवृद्ध कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ४८ शिल्पकारांनी आजच्या कार्यशाळेत आपल्या शिल्पाकृती तयार करून सादर केल्या. यामध्ये यश कुंभार याच्या शिल्पाकृतीस प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले.



शिवाजी विद्यापीठाचा संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग आणि शिल्पसम्राट कला स्टुडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेमध्ये काही हौशी, काही शिकाऊ आणि काही तयार अशा ४८ शिल्पकारांनी सहभाग घेतला. सहावीच्या विद्यार्थ्यापासून ते ७० वर्षांच्या ज्येष्ठांपर्यंत व्यक्तींचा सहभाग हे कार्यशाळेचे वैशिष्ट्य ठरले. काहींनी तर प्रथमच हातात माती घेऊन तिला आकार देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. बी.आर. खेडकर यांच्या कन्या शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के आणि शिल्पकार संजीव संकपाळ यांनी सुरवातीला सहभागींना शिल्प कसे तयार करावयाचे याची प्रात्यक्षिके दाखविली. त्यानंतर सहभागींनी त्यांच्या त्यांच्या कल्पनेनुसार विविध शिल्पे साकारली. त्यामध्ये बी.आर. खेडकर यांना आदरांजलीपर अशीही काही शिल्पे तयार करण्यात आली. भित्तीशिल्पे, मूर्ती, लाईव्ह मूर्ती, संकल्पशिल्पे अशा अनेक प्रकारच्या शिल्पाकृती कलाकारांनी तयार केल्या.

सायंकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यामध्ये यश कुंभार याने प्रथम, दर्शन मिस्त्री याने द्वितीय आणि रोहन कुंभार याने तृतीय क्रमांक प्राप्त केला. त्यांना अनुक्रमे रु. २०००, रु. १००० आणि रु. ५०० रोख आणि प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. त्याखेरीज, रोहित बावडेकर, अभिनंदन कुंभार आणि मन्वित कांबळे यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. शिल्पकार संजीव संकपाळ, कलाकार बबन माने आणि स्वतः सीमा खेडकर-शिर्के यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

सकाळच्या सत्रात बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रासमोरील उद्यानात प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते शिल्पमहर्षी शिल्पकार स्व. बी.आर. खेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. शिल्पकार खेडकर यांचा आदर्श घेऊन नवोदित शिल्पकारांमध्ये जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनत करण्याची तीव्र इच्छाशक्ती निर्माण व्हावी, अशी अपेक्षा यावेळी डॉ. पाटील यांनी व्यक्त केली. कार्यशाळेत कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, सातारा, कणकवली, छत्रपती संभाजीनगर, निपाणी येथील ४८ कलाकारांनी सहभाग घेतला.

संध्याकाळी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी कार्यशाळेत सहभागी कलाकारांनी तयार केलेल्या प्रत्येक शिल्पाकृतीची पाहणी करून त्याविषयी आणि कलाकारांविषयीही जाणून घेतले. येथून पुढे दरवर्षी अशा प्रकारची कार्यशाळा विद्यापीठात आयोजित करण्यात यावी आणि तिचे राष्ट्रीय कार्यशाळेत रुपांतर व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पारितोषिक वितरण समारंभाचे सूत्रसंचालन तृप्ती पुरेकर यांनी केले, तर संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी आभार मानले. कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी बबन माने, दीपक बीडकर यांच्यासह बी.आर. खेडकर यांच्या कन्या आणि त्यांच्या कुटुंबियांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 FEB 2025

# बी.आर. खेडकर शिल्पकला कार्यशाळेला शिवाजी विद्यापीठात उत्स्फूर्त प्रतिसाद



१) आबालवृद्धांकडून ४८ शिल्पाकृतींची निर्मिती; यश कुंभार याला प्रथम पारितोषिक २) शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के, संजीव संकपाळ आणि डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांच्यासमवेत शिल्पकला कार्यशाळेतील पारितोषिक विजेते ३) शिवाजी विद्यापीठात आयोजित शिल्पकला कार्यशाळेत सहभागींना प्रात्यक्षिक दाखविताना शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के.



शिवाजी विद्यापीठात आयोजित शिल्पकला कार्यशाळेत सहभागींनी तयार केलेल्या शिल्पाकृतींची पाहणी करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के, डॉ. विनोद ठाकूरदेसाई आदी. १) शिवाजी विद्यापीठात आयोजित शिल्पकला कार्यशाळेत सहभागी कलाकार आपल्या शिल्पाकृती घडविताना २) शिवाजी विद्यापीठात आयोजित शिल्पकला कार्यशाळेत सहभागी कलाकार आपल्या शिल्पाकृती घडविताना ३) शिवाजी विद्यापीठात आयोजित शिल्पकला कार्यशाळेत सहभागी कलाकार शिल्पाकृती घडविताना

कोल्हापूर : शिल्पमहर्षी शिल्पकार स्व. बी.आर. खेडकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुणे येथील शिल्पसम्राट कला स्टुडिओ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या शिल्पकला कार्यशाळेला आबालवृद्ध कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ४८ शिल्पकारांनी आजच्या कार्यशाळेत आपल्या शिल्पाकृती तयार करून सादर केल्या. यामध्ये यश कुंभार याच्या शिल्पाकृतीस प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाचा संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग आणि शिल्पसम्राट कला स्टुडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेमध्ये काही हौशी, काही शिकाऊ आणि काही तयार अशा ४८ शिल्पकारांनी सहभाग घेतला. सहावीच्या विद्यार्थ्यापासून ते ७० वर्षांच्या ज्येष्ठांपर्यंत व्यक्तींचा सहभाग हे कार्यशाळेचे वैशिष्ट्य ठरले. काहींनी तर प्रथमच हातात माती घेऊन तिला आकार देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. बी.आर. खेडकर यांच्या कन्या शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के आणि शिल्पकार संजीव संकपाळ यांनी सुरवातीला सहभागींना शिल्प कसे तयार करायचे याची प्रात्यक्षिके दाखविली. त्यानंतर सहभागींनी त्यांच्या त्यांच्या कल्पनेनुसार विविध शिल्पे साकारली. त्यामध्ये बी.आर. खेडकर यांना आदरांजलीपर अशीही काही शिल्पे तयार करण्यात आली. भित्तीशिल्पे, मूर्ती, लाईव्ह मूर्ती, संकल्पशिल्पे अशा अनेक प्रकारच्या शिल्पाकृती कलाकारांनी तयार केल्या.

सायंकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यामध्ये यश कुंभार याने प्रथम, दर्शन मिस्त्री याने द्वितीय आणि रोहन कुंभार याने तृतीय क्रमांक प्राप्त केला. त्यांना अनुक्रमे रु. २०००, रु. १००० आणि रु. ५०० रोख आणि प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. त्याखेरीज, रोहित बावडेकर, अभिनंदन कुंभार आणि मन्वित कांबळे यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. शिल्पकार संजीव संकपाळ, कलाकार सचिन माने आणि स्वतः सीमा खेडकर-शिर्के यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

सकाळच्या सत्रात बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रासमोरील उद्यानात प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते शिल्पमहर्षी शिल्पकार स्व. बी.आर. खेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. शिल्पकार खेडकर यांचा आदर्श घेऊन नवोदित शिल्पकारांमध्ये जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनत करण्याची तीव्र इच्छाशक्ती निर्माण व्हावी, अशी अपेक्षा यावेळी डॉ. पाटील यांनी व्यक्त केली. कार्यशाळेत कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, सातारा, कणकवली, छत्रपती संभाजीनगर, निपाणी येथील ४८ कलाकारांनी सहभाग घेतला. संध्याकाळी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी कार्यशाळेत सहभागी कलाकारांनी तयार केलेल्या प्रत्येक शिल्पाकृतीची पाहणी करून त्याविषयी आणि कलाकारांविषयीही जाणून घेतले. येथून पुढे दरवर्षी अशा प्रकारची कार्यशाळा विद्यापीठात आयोजित करण्यात यावी आणि तिचे राष्ट्रीय कार्यशाळेत रुपांतर व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पारितोषिक वितरण समारंभाचे सूत्रसंचालन तृप्ती पुरेकर यांनी केले, तर संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी आभार मानले. कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी सचिन माने, दीपक बीडकर यांच्यासह बी.आर. खेडकर यांच्या कन्या आणि त्यांच्या कुटुंबियांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 FEB 2025

दै. रणझुंजार

# राज्यघटना जास्तीत जास्त तरुणांपर्यंत पोहोचवावी : कुलगुरु प्रा. शिर्के

## : 'संविधान अमृतमहोत्सव विशेषांका'चे प्रकाशन



मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मीडिया स्पेक्टमच्या 'संविधान अमृतमहोत्सव विशेषांका'चे प्रकाशन करताना कुलगुरु प्रा. डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील आणि विद्यार्थी.

कोल्हापूर, (प्रतिनिधी) : भारतीय राज्यघटना मौलिक असून ती जास्तीत जास्त तरुणांपर्यंत पोहोचवली पाहिजे, असे मत कुलगुरु प्रा. डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'मीडिया स्पेक्टम'च्या 'संविधान अमृतमहोत्सव विशेषांका'च्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

कुलगुरु प्रा. शिर्के म्हणाले, देशभर संविधान अमृत महोत्सव साजरा केला जात आहे. शिवाजी विद्यापीठानेही अमृत महोत्सवानिमित्त विविध उपक्रम राबविले आहेत. याचाच एक भाग म्हणून मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेला 'संविधान अमृत महोत्सव विशेषांका'कडे पाहता येते. या अंकात राज्यघटनेतील विविध अंगांना स्पर्श केला असून यातून तरुणांमध्ये जागृती निर्माण होण्यास मदत होईल. अंक तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांनी काही संदर्भ जमवले आणि घटनेच्या मूळ प्रतीचा अभ्यास करुन मांडणी केली, ही बाब विशेष कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.

मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये आत्मसात करावीत. माहिती देताना संतुलित स्वरुपाची माहिती त्यांनी द्यावी. विद्यार्थ्यांना प्रश्न पडले पाहिजेत आणि त्यासाठी विद्यार्थ्यांनी कोणताही विषय मुळापासून समजून घेण्याची तयारी ठेवली पाहिजे, असेही कुलगुरु प्रा. शिर्के म्हणाले.

प्र-कुलगुरू प्रा. पाटील म्हणाले, राज्यघटना तयार करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दूरदृष्टी पहायला मिळते. राज्यघटनेतील विविध कलमे मनात कोरुन ठेवावी अशी आहेत. राज्यघटनेने मानवी जीवनाच्या सर्वच अंगांचा विचार केला आहे. अगदी पर्यावरणासारख्या महत्त्वाच्या विषयाची नोंदही राज्यघटनेने घेतली आहे. राज्यघटनेवर सर्वांनीच चिंतन आणि मनन करणे आवश्यक आहे.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी येत्या काळात विद्यार्थ्यांनी नवनवे विषय हाताळून आणखी व्यापक विशेषांक प्रकाशित करावेत, असे आवाहन केले. प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. उद्देश पाटील आणि सानिका भोरे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 FEB 2025
तरुण भारत

# राजर्षी शाहू संगीत रजनीचे गुरूवारी उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे राजर्षी शाहू संगीत रजनीचे आयोजन केले आहे. गुरूवार ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता संगीत रजनीचे उद्घाटन राम गणेश गडकरी सभागृहात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे.

- **शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे कार्यक्रमाचे आयोजन**

दिल्लीतील चिन्मयी आठले -ओक यांचे शास्त्रीय गायन तर संवादीनी वादक पंडीत सुधीर नायक यांचे एकल संवादीनी वादन होणार आहे. ७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता पुणे (आळंदी)येथील सोहम गोराणे यांचे एकल तबला वादन होणार अहे. तर ग्वाल्हेर-आग्रा घराण्याचे मुंबई येथील गायक पंडीत सुरेश बापट यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 FEB 2025
सकाळ

# गुरुवारपासून रंगणार राजर्षी शाहू संगीत रजनी

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे गुरुवारी (ता. ६) आणि शुक्रवारी (ता. ७) सायंकाळी साडेपाच वाजता राजर्षी शाहू संगीत रजनी पेटाळा येथील राम गणेश गडकरी सभागृहात होणार आहे.

या संगीत रजनीचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार असून, यावेळी प्रं-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित असणार आहेत.

या संगीत रजनीच्या पहिल्या दिवशी पहिल्या सत्रामध्ये चिन्मयी आठले - ओक (दिल्ली) यांचे शास्त्रीय गायन होणार असून, दुसऱ्या सत्रामध्ये प्रसिद्ध संवादिनी वादक पंडित सुधीर नायक यांचे एकल संवादिनी वादन होणार आहे. दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमामध्ये पहिल्या सत्रात सोहम गोराणे- पुणे (आळंदी) या तरुण तडफदार कलाकाराचे एकल तबला वादन होणार असून, दुसऱ्या सत्रामध्ये ग्वाल्हेर-आग्रा घराण्याचे प्रसिद्ध गायक पंडित सुरेश बापट (मुंबई) यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. या दोनदिवसीय कार्यक्रमासाठी रसिकांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 FEB 2025
लोकमत

# शाहू संगीत रजनी गुरुवारपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे ६ व ७ फेब्रुवारीला राजर्षी शाहू संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले आहे. ही दोन दिवसीय संगीत रजनी रोज संध्याकाळी ५:३० वाजता पेटाळा येथील राम गणेश गडकरी सभागृहात होईल.

कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते याचे उद्घाटन होणार असून, यावेळी प्र-कुलगुरू प्रा.डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. दोन दिवस होणाऱ्या या संगीत रजनीमध्ये पहिल्या दिवशी पहिल्या सत्रामध्ये चिन्मयी आठले यांचे शास्त्रीय गायन होणार असून, दुसऱ्या सत्रामध्ये प्रसिद्ध संवादिनी वादक पं. सुधीर नायक यांचे एकल संवादिनी वादन होणार आहे.

दुसऱ्या दिवशी सोहम गोराणे (आळंदी) या कलाकाराचे एकल तबला वादन होईल. दुसऱ्या सत्रात ग्वाल्हेर-आग्रा घराण्याचे गायक पं. सुरेश बापट यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. रसिकांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्र.-विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले.

04 FEB 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE

Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# 'राजर्षी शाहू संगीत रजनी- २०२५'चे ६ व ७ फेब्रुवारीला आयोजन

**कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी दिनांक ६ व ७ फेब्रुवारी २०२५ रोजी शिवाजी विद्यापीठ, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे राजर्षी शाहू संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले आहे. ही दोन दिवसीय संगीत रजनी दररोज संध्याकाळी ५:३० वाजता राम गणेश गडकरी सभागृह, पेटळा कोल्हापूर येथे होईल.

संगीत रजनीचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. प्रा. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार असून या प्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमला कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदेही उपस्थिती रहाणार आहेत.

दोन दिवस होणाऱ्या या संगीत रजनीमध्ये पहिल्या दिवशी पहिल्या सत्रामध्ये सौ, चिन्मयी आठले - ओक, दिल्ली यांचे शास्त्रीय गायन होणार असून दुसऱ्या सत्रामध्ये प्रसिद्ध संवादीनी वादक पं. सुधीर नायक यांचे एकल संवादीनी वादन होणार आहे. दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमध्ये पहिल्या सत्रात कु. सोहम गोराणे, पुणे (आळंदी) या तरुण तडफदार कलाकाराचे एकल तबला वादन होणार असून दुसऱ्या सत्रामध्ये ग्वाल्हेर-आग्रा घराण्याचे प्रसिद्ध गायक पं सुरेश बापट, मुंबई यांचे शास्त्रीय गायन होणार आहे.

या दोन दिवसीय कार्यक्रमासाठी रसिकांनी आवर्जून उपस्थिती रहावे असे आव्हाहन संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्र. विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 FEB 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठात उद्या माध्यम संशोधन कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने बुधवार, दि. ५ रोजी एकदिवसीय माध्यम संशोधन कार्यशाळा आयोजित केली आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के असतील. अमरावती येथील सहायक प्रा. डॉ. विनोद निताळे, अहिल्यानगर येथील डॉ. बापू चंदनशिवे मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा सर्वांना खुली असून संबंधितांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 FEB 2025
सकाळ

# ऑनलाईन शिक्षण अपरिहार्य : लोखंडे

कोल्हापूर, ता. ३ : 'नवीन शैक्षणिक धोरणानुसार आणि वाढत्या तंत्रज्ञानामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांना ऑनलाइन अध्यापन आणि अध्ययन करणे अपरिहार्य असणार आहे. यासाठी ई-कंटेंट निर्मितीवर भर द्यायला हवा', असे प्रतिपादन मुंबई येथील महास्वयंम् ऑनलाईन कोर्सचे प्रशिक्षक गणेश लोखंडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्र आणि एम.ए. मास कम्युनिकेशन विभागातर्फे पी. एम. उषा योजनेअंतर्गत आयोजित 'डिझाईन ॲन्ड डेव्हलपमेंट ऑफ ई-कन्टेन्ट फॉर ऑनलाईन लर्निंग ॲन्ड मूक्स' कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. रामचंद्र पवार होते. गणेश लोखंडे यांनी केंद्र आणि राज्य शासनाच्या स्वयं, महास्वयंम् या ऑनलाईन कोर्सबाबतची माहिती दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 FEB 2025
सकाळ

# शिवाजी विद्यापीठास राष्ट्रीय रग्बीत सुवर्ण

**कोल्हापूर :** भुवनेश्वर (ओडिशा) येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सेव्हन ए साईड रग्बी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ महिला संघाने केआयआयटी विद्यापीठ संघास पराभूत करीत सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक पटकाविले. या विजयी संघात वैष्णवी पाटील, कल्याणी पाटील, शुभांगी गावडे, साक्षी कुंभार, पूनम पाटील, प्राची पारखे, पूजा कुंभार, ऋतुजा किर्दत, आकांक्षा कातकडे, सायली पाटील, स्वाती माळी, नेहा पाटील यांचा समावेश होता. या संघास मुख्य प्रशिक्षक दीपक पाटील, सहायक प्रशिक्षक प्रा. दीपक लहाने, व्यवस्थापक प्रा. सुहास वाघ यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 FEB 2025
सकाळ

# अल्फ्रेडी मोयो यांना पीएच.डी.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्राचा विद्यार्थी अल्फ्रेडी मोयो याने साडेतीन वर्षांत संशोधन करून पीएच. डी. मिळवली. स्टिमोडिया विस्कोसा (चिकट्या डांगर) व स्टेमोडिया वर्टिसिलाटा (डांगर) वनस्पतींवर संशोधन केले. तो मूळचा टांझानिया येथील असून, तो मायदेशी नुकताच परतला. विशेष म्हणजे त्याने कोल्हापुरी संस्कृती आत्मसात करत तो मराठी भाषा बोलायला शिकला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते त्याचा सत्कार झाला. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. घुले, प्रा. जी. बी. कोळेकर, प्रा. एस. एस. कोळेकर, प्रा. एस. डी. डेळेकर यांनी त्याचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या. यावेळी त्याचे मार्गदर्शक प्रा. डॉ. प्रशांत अनभुले, प्रा. एस. पी. हंगीरगेकर, प्रा. डी. एम. पोरे, प्रा. डी एच. दगडे, डॉ. एस. ए. संकपाळ, डॉ. डी. एच. बनगे उपस्थित होते. सहकारी डॉ. स्नेहा भोसले, तृप्ती यादव, कुंभार यांनी त्याला संशोधन कार्यात सहकार्य केले.